महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कार्यकारी संपादक : श्री. विजय यादव | jeevandeepvartanews2020@gmail.com | Rs.2/- | मुख्य संपादक : श्री. रविंद्र घोडविंदे

मंगळवार ❖ ०३ डिसेंबर २०२४ ❖ वर्ष ६ ❖ अंक - १५८ ❖ पाने - ४

RNI NO : MAHMAR/2016/72091 Postal Reg. No. THC/256/2022-2024

## विधीमंडळ पक्षनेता निवडीसाठी

# भाजपकडून दोन निरीक्षकांची नियुक्ती!



## विजय रुपाणी आणि निर्मला सीतारामन आज मुंबईत

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता प्रतिनिधी**

मुंबईः विधानसभा निवडणुकीचा निकाल लागून आठवडा उलटला असला तरीही सत्ता स्थापनेचा पेच कायम आहे. महायुतीमधील शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेसच्या आमदारांनी आपापल्या विधिमंडळ गटनेत्याची निवड केलेली आहे. पण सर्वात मोठा पक्ष ठरलेल्या भाजपनं अद्याप तरी विधिमंडळ गटनेता निवडलेला नाही. ५ डिसेंबरला मुख्यमंत्र्यांचा शपथविधी होणार आहे. तर ४ डिसेंबरला भाजपकडून विधिमंडळ गटनेता निश्चित करण्यात येईल. त्यासाठी भाजपच्या नेतृत्त्वानं दोन निरीक्षकांची नियुक्ती केली आहे.

भाजपच्या नेतृत्त्वानं महाराष्ट्रासाठी निरीक्षक म्हणून विजय रुपाणी आणि निर्मला सीतारामन यांची निवड केलेली आहे. विजय रुपाणी गुजरातचे माजी मुख्यमंत्री आहेत. त्यांच्याकडे पंजाबचादेखील प्रभार आहे. ते पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे अतिशय निकटवर्तीय म्हणून ओळखले जातात. गुजरातमध्ये पाटीदार समाजाचं आंदोलन पेटलेलं असताना रुपाणी यांच्याकडे मुख्यमंत्रिपद होतं. २०१६ ते २०२१ या कालावधीत त्यांनी मुख्यमंत्रिद पान ४ वर ▶▶



**भाजप नेते सुधीर मुनगंटीवार यांनी प्रतिक्रिया दिली. 'ही चांगली गोष्ट आहे. जेव्हाही नेत्याची निवड होते तेव्हा पक्षाची बैठक घेऊन, नेता निवडीचा जो नियम असतो त्या नियमाचं पालन करावं लागतं. प्रत्येक ठिकाणी तसंच होतं. पक्षाकडून निरीक्षक येतात. चर्चा होते आणि सर्वानुमते नेता निवडीची प्रक्रिया पार पडते. त्यामुळे निरीक्षक हे येतीलच. त्यानंतर नेता निवडीचा कार्यक्रम पार पडेल आणि नंतर नव्या सरकारचा शपथविधीचा कार्यक्रम पार पडेल. त्यामुळे निरीक्षक येतील. त्यात शंका नाही', अशी प्रतिक्रिया सुधीर मुनगंटीवार यांनी दिली.**

### मुख्यमंत्र्यांच्या नावाची घोषणा

**काळजीवाहू मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी मुख्यमंत्रिपदाच्या शर्यतीतून माघार जरी घेतली असली तरी त्यांच्या काही मागण्यांनी नव्या सरकारच्या शपथविधीत खो घातलाय. याच कारणाने भाजपाच्या विधिमंडळ पक्षाची बैठक दोनदा पुढे ढकलण्यात आलीय. या दरम्यान भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळेंनी नव्या सरकारचा शपथविधी ५ डिसेंबरला सायंकाळी ५ वाजता होईल, याची माहिती दिलीय. परंतु मुख्यमंत्री कोण? यावर अद्याप प्रश्नचिन्ह आहे. अशा परिस्थितीत अखेर भाजपाने गुजरातचे माजी मुख्यमंत्री विजय रुपाणी आणि केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामण यांची विधिमंडळ पक्षाच्या बैठकीसाठी निरीक्षक म्हणून नेमणूक केलीय. मिळालेल्या माहितीनुसार, बुधवारी ४ डिसेंबरला भाजपा विधिमंडळ पक्षाची बैठक होत असून, या बैठकीत मुख्यमंत्र्यांच्या नावाची घोषणा हे निरीक्षक करणार आहेत.**

### अमित शाह यांची भेट

**भाजपा विधिमंडळ पक्षाच्या बैठकीसाठी २९ नोव्हेंबर, १ डिसेंबर, ३ डिसेंबर अशा तारखा देण्यात आल्या होत्या. ५ डिसेंबरला शपथविधी असल्याकारणाने अखेर भाजपा विधिमंडळ पक्षाच्या बैठकीसाठी ४ डिसेंबर ही तारीख जवळपास नक्की करण्यात आलीय. त्यातच देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार हे दिल्ली दौरा करणार असून, या दौऱ्यात केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्याकडे संभाव्य मंत्र्यांची यादी त्यांच्या रिपोर्ट कार्डसह देणार आहेत. यापूर्वी मागील महिन्यात २८ नोव्हेंबरला एकनाथ शिंदे, देवेंद्र फडणवीस आणि अजित पवारांनी दिल्लीत केंद्रीय गृहमंत्री अमित शाह आणि भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा यांची भेट घेतली होती.**



## नव्या सरकारच्या शपथविधी सोहळ्याची महातयारी

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता प्रतिनिधी**

महायुतीच्या शपथविधीचा मुहूर्त ठरला असून येत्या ५ डिसेंबर रोजी सायंकाळी ५ वाजता भाजपचा मुख्यमंत्री शपथ घेणार आहे. त्यासाठी देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भाजपचे अनेक वरिष्ठ नेते उपस्थित राहणार आहेत. मुख्यमंत्रिपदाचं नाव अद्याप जाहीर केलं नसलं तरीही देवेंद्र फडणवीस हेच मुख्यमंत्री होतील हे आता जवळपास निश्चित झालं आहे.

मुंबईतील आझाद मैदानात हा शपथविधी सोहळा संपन्न होणार असून या सोहळयासाठीचा भव्य दिव्य मंच आणि जय्यत तयारी करण्यात आली आहे. आझाद मैदानावरती ५ डिसेंबरला संध्याकाळी ५ वाजता शपथविधी पार पडणार आहे. या शपथविधी सोहळयासाठी साधारणतः ३० ते ४० हजार लोक अपेक्षित आहेत. त्या अनुषंगाने आझाद मैदानात एकुण ३ स्टेज असणार आहे.

**नव्या सरकारच्या शपथविधी सोहळयाची महातयारी**

मुख्य स्टेज हा ६० बाय १०० बाय ८ फुट असणार आहे. या मंचावर पंतप्रधान आणि इतर राज्यांचे मुख्यमंत्री असतील. तर उजव्या बाजूला ८० बाय ५० बाय ७ फुट लांबीचा मंच असेल. यावर सर्व साधू संत बसतील. तर डाव्या बाजूला ८० बाय ५० बाय ७ फुटाचा एक स्टेज असेल. या मंचावर छ. शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची प्रतिमा असेल आणि साऊंड सिस्टीम या ठिकाणी असणार आहे. मुख्य मंचाच्या उजव्या बाजूला खासदार आणि आमदार यांची बसण्याची व्यवस्था केली आहा. त्यासाठी ४०० खुर्च्या असणार आहे. बाजूला आणि मुख्य मंचाच्या समोर ञ्म्छ यांची आसनव्यवस्था करण्यात आली आहे. जवळपास १००० खुर्ची या ठिकाणी असणार आहे.

डाव्या बाजूला महायुतीमधील मुख्य पदाधिकारी यांच्यासाठी आसनव्यवस्था करण्यात आली आहे. तर कार्यकर्त्यांसाठी सात विभागात बसण्याची आसनव्यवस्था करण्यात आली आहे. संपुर्ण मंचाचा बाजूला ६ बाय १६ उंचीचे कटआउट लावले जातील. कार्यकर्ते यांच्यासाठी एकुण तीन प्रवेशद्वार असणार आहे. मुंबई महापालिका समोर हे प्रवेशद्वार असणार आहे. व्हीआयपी यांच्यासाठी एकुण तीन प्रवेशद्वार असतील. फॅशन स्ट्रीट कडून व्हीआयपीनी प्रवेश दिला जाईल.

अमित शाह यांनी रिपोर्टकार्ड मागवली-

अमित शाह यांनी मंत्रिमंडळात समाविष्ट होऊ पाहणाऱ्या आमदारांच रिपोर्ट कार्ड मागवल्याची माहिती समोर पान ४ वर ▶▶

## ९८व्या मराठी साहित्य संमेलनाच्या स्वागताध्यक्षपदी शरद पवार



**दै.ठाणे जीवनदीप वार्ता प्रतिनिधी**

**पुणे :** तब्बल सात दशकांनी देशाची राजधानी दिल्ली येथे होत असलेल्या ९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या स्वागताध्यक्षपदी ज्येष्ठ नेते शरद पवार यांची निवड करण्यात आली आहे. अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे उद्घाटन करण्याची संधी यापूर्वी चार वेळा लाभलेले शरद पवार यंदा प्रथमच स्वागताध्यक्ष झाले आहेत.

सरहद संस्थेच्या वतीने २१ ते २३ फेब्रुवारी या कालावधीत दिल्ली येथील तालकटोरा मैदानावर हे संमेलन होणार आहे. मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याच्या पार्श्वभूमीवर दिल्लीमध्ये होणारे संमेलन यशस्वी करण्याच्या उद्देशातून केंद्रीय वाहतूकमंत्री नितीन गडकरी, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांना यापूर्वी झालेल्या कार्यक्रमांसाठी निमंत्रित करण्यात आले होते. या पुढील कार्यक्रम आणि व्यवस्थांमध्ये राज्याचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ आणि भाजपचे राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे यांचे सहकार्य घेण्यात येणार असल्याची माहिती सरहद संस्थेचे संजय नहार यांनी सोमवारी दिली. महाराष्ट्र साहित्य परिषदेचे कार्याध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी, प्रमुख कार्यवाह सुनीताराजे पवार, संयोजन समितीचे डॉ. सतीश देसाई आणि सरहद संस्थेचे शैलेश पगारिया या वेळी उपस्थित होते.

दिल्ली ही देशाची राजकीय राजधानी असल्यामूळे येथे होणारे संमेलन सर्वसमावेशक व्हावे या भावनेतून संमेलनाच्या स्वागताध्यक्षपदी अनुभवी, ज्येष्ठ व साहित्यरसिक व्यक्ती व्हावी असा संयोजक समितीने प्रयत्न केला त्यातून शरद पवार यांना संस्थेने केलेली विनंती पवार यांनी मान्य केली. शरद पवार हे केवळ उत्तम वाचक अथवा साहित्यप्रेमी ना स ा ू ना पान ४ वर ▶▶


## उच्च न्यायालयाच्या आदेशानंतर डोंबिवलीतील

# बेकायदा इमारतीवर पालिकेचा हातोडा

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता प्रतिनिधी**

**डोंबिवली -** डोंबिवली जवळील गोळवली गाव हद्दीतील शिळफाटा रस्त्यालगतचा शुभारंभ बॅन्क्वेट हॉल मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती अजय गडकरी व न्यायमूर्ती कमल खाता यांच्या आदेशावरून कल्याण डोंबिवली पालिकेच्या आय प्रभागाच्या अधिकाऱ्यांनी दोन दिवसांच्या कारवाईत भुईसपाट केला. ग्रामपंचायतीला बांधकाम परवानगीचे अधिकार आहेत का, असा प्रश्न करत, न्यायालयाने गोळवली ग्रामपंचायतीच्या बांधकाम परवानगीचा आधार घेऊन उभारण्यात आलेले शुभारंभ हॉलचे बांधकाम बेकायदा आहे, असा निष्कर्ष नोंदविला.

हे बांधकाम बेकायदा असल्याने ते आपण स्वताहून तोडून घेता की आम्ही आदेश देऊ, असे प्रश्न न्यायालयाने पालिकेच्या वकिलाला केले. पालिकेचे वकील अ‍ॅड. संदीप शिंदे यांनी दोन दिवसात हे बेकायदा बांधकाम तोडण्याचे आश्वासन न्यायालयाला दिले. पालिकेच्या आय प्रभागाचे साहाय्यक आयुक्त भारत पवार यांनी शनिवारी सुट्टी असुनही आयुक्त डॉ. इंदुराणी जाखड, उपायुक्त अवधूत तावडे य ा ं च य ा ा पान ४ वर ▶▶



# खासदार बाळ्या मामा फडणवीसांच्या भेटीसाठी सागर बंगल्यावर



**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

मुंबईः राज्यातील विधानसभा निवडणुकीत महायुतीने एकहाती सत्ता मिळवत महाविकास आघाडीला धोबीपछाड दिला होता. यानंतर आता पुढील पाच वर्षे राज्यात आणि केंद्रात महायुती आणि एनडीएची सत्ता असणार आहे. या पार्श्वभूमीवर आता महाराष्ट्रात नवी राजकीय समीकरणे आकाराला येण्याची शक्यता वर्तविली जात आहे. कारण, सागर बंगल्यावर सोमवारी दुपारी शरद पवार गटाचे खासदार सुरेश म्हात्रे उर्फ बाळया मामा देवेंद्र फडणवीस यांच्या भेटीसाठी हजर झाले. सुरेश म्हात्रे भिवंडी लोकसभा मतदारसंघाचे आमदार आहेत. मे महिन्यात झालेल्या निवडणुकीत सुरेश म्हात्रे हे कपिल पाटील यांचा पराभव करत जायंट किलर ठरले होते. मात्र, आता विधानसभेच्या निकालानंतर सुरेश म्हात्रे अचानक देवेंद्र फडणवीसांच्या सागर बंगल्यावर पोहोचल्याने राजकीय वर्तुळाच्या भुवया उंचावल्या आहेत. दरम्यान, सुरेश म्हात्रे आणि देवेंद्र फडणवीस यांच्या या भेटीचा नेमका तपशील अद्याप समोर आलेला नाही. बाळया मामा यांनी आपण देवेंद्र फडणवीस यांची सदिच्छा भेट घेण्यासाठी आल्याचे सांगितले. मात्र, बाळया मामा आणि फडणवीसांच्या भेटीने राजकीय वर्तुळात पान ४ वर ▶▶



बाळया मामा म्हात्रे यांनी भाजपचे दिग्गज नेते कपिल पाटील यांचा लोकसभा निवडणुकीत पराभव केला आहे. त्यामुळे बाळया मामा आणि देवेंद्र फडणवीस यांच्या भेटीकडे सर्वांचं लक्ष आहे. याबाबत आता काय-काय घडामोडी घडतात? ते पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे. दरम्यान, शरद पवार गटाचे नेते रोहित पवार यांनी या भेटीवर प्रतिक्रिया दिली आहे. 'बाळा मामा यांच्या मतदारसंघात गुन्हेगारी वाढली असेल म्हणून ते भेटले असतील, मात्र आमचे आमदार कुठेही संपर्क करत नाहीयत, जर असं कुणी काही करत असेल तर ते लोकांना आवडणार नाही', अशी प्रतिक्रिया रोहित पवार यांनी दिली आहे.

# ६५ अनधिकृत इमारतींबाबत आयुक्तांवर गुन्हा दाखल करण्याची राष्ट्रवादीची मागणी

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता/मुंबई(प्रतिनिधी) :** मुंबई उच्च न्यायालयाने डोंबिवली येथील ६५ अनधिकृत बांधकाम केलेल्या इमारतींवर तोडक कारवाई करण्याचे दिलेल्या आदेशामुळे निरपराध शेकडो रहिवासी बेघर होणार आहेत. या प्रकरणी पालिका अधिकारी देखील तितकेच दोषी असून याबाबत आयुक्तांवर गुन्हा दाखल करण्याची मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरद पवार गटाचे माजी प्रदेश सचिव नोवेल साळवे यांनी केली आहे.

कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या भोंगळ कारभार व भ्रष्टाचार मुळे ही घटना घडली असून, या अनधिकृत बांधकाम प्रकरणात महापालिकेच्या किती अधिकारींना व लोकप्रतिनिधींना तुरुंगात टाकण्यात आले आहे याची ही माहिती उच्च न्यायालयाने घेतले पाहिजे. कारण बिल्डर, महापालिका अधिकारी व स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्या संगनमतामुळेच अशा अनधिकृत इमारती उभारल्या जातात. यात घर घेण्यासाठी सर्वसामान्य माणसांची फसवणूक केली जाते. सर्वसामान्य कुटुंबाला स्वताचे घर घेण्यासाठी आयुष्यभर मेहनतीने कमवलेला पैसे घालून जेव्हा त्यांची फसवणूक होते, अशा वेळी राज्य सरकारने दखल घेतली पाहिजे.

कारण त्या इमारतीच्या डेव्हलपमेंट दरम्यान कुठल्या न कुठल्या प्रकारे त्या इमारतीचे व जनतेचा पैसा सरकारच्या तिजोरीत जातो. मोठमोठ्या अनधिकृत इमारती अशाच उभ्या राहत नाहीत त्यामध्ये महापालिका आयुक्तांचाही आशिर्वाद लाभलेला असतो असा आरोप म्हणूसाळवे यांनी केला आहे. त्यामुळे अनधिकृत बांधकामाच्या प्रकरणात आयुक्तांवर ही गुन्हा दाखल झाला पाहिजे. कल्याण डोंबिवली महापालिका हद्दीतील अशा अनेक अनधिकृत बांधकामे असतीलच त्यांचीही उच्च स्तरीय चौकशी झाली पाहिजे. कारण आज पण मोहने आंबिवली टिटवाळा या परिसरात अनेक अनधिकृत बांधकामे झाली आहेत व सुरू असल्याचे नोवेल साळवे यांनी सांगितले.

# अजरामर कवियत्री बहिणाबाई चौधरी



मराठी साहित्यातील अजरामर कवियत्री बहिणाबाई चौधरी यांचा आज ३ डिसेंबर रोजी ७३ वा स्मृतिदिन. बहिणाबाई चौधरी यांचा जन्म २४ ऑगस्ट १८८० रोजी जळगाव जवळील असोदे या गावी झाला. त्यावेळेच्या परंपरेनुसार वयाच्या अवघ्या तेराव्या वर्षी त्यांचा विवाह झाला. दुर्दैवाने तरुणपणीच त्यांना वैधव्य आले.

सुरवातीचे एकत्र कुटुंब विभक्त झाल्यावर आणि नवऱ्याच्या निधनानंतर त्यांचे जीवन हलाखीत गेले. पण त्याही परिस्थितीत त्यांनी आपली कन्या काशी आणि पुत्र सोपानदेव व ओंकार यांच्यावर चांगले संस्कार केले. बहिणाबाई या कधीही शाळेत गेल्या नाही. त्यांना लिहिता वाचता येत नव्हते त्यामुळे त्यांनी केलेल्या अनेक कविता काळाच्या ओघात नष्ट झाल्या. त्या निरीक्षर होत्या मात्र त्यांना कवितेची निसर्गदत्त देणगी लाभली होती. घरातील आणि शेतातील कामे करता करता त्यांना काव्य सुचले आणि ते काव्य मराठी साहित्य विश्वात अजरामर ठरले. बहिणाबाई शेतात गेल्या की शेतीवर उत्स्फूर्त कविता म्हणत. घरकाम करतानाही त्यांना कविता सुचत. घरकाम करता करता त्या कविता गुणगुणत तसेच जात्यावर दळताना विविध प्रकारच्या ओव्या म्हणत. त्यांनी अशा हजारो कविता केल्या आहेत. मात्र आज त्या सर्व कविता उपलब्ध नाहीत. बहिणाबाईंचे चिरंजीव सोपानदेव शाळेत जाऊ लागल्यावर ते बहिणाबाईंच्या कविता आपल्या वहीत लिहून घेऊ लागले. याकामी त्यांना त्यांचे मावसभाऊ पितांबर चौधरी हे मदत करत. बहिणाबाई काम करताना जेंव्हा कविता म्हणत तेंव्हा सोपानदेव त्या कविता आपल्या वहीत लिहून घेत असत. त्यांचे चिरंजीव सोपानदेव चौधरी हे ही पुढे महाराष्ट्रातील नामवंत कवी म्हणून नावारूपास आले.

बहिणाबाईंचे चिरंजीव सोपानदेव व मावसभाऊ पितांबर चौधरी यांनी लिहून घेतलेली कविता, गाणी हस्तलिखित स्वरूपात होती. बहिणाबाईंच्या मृत्यूनंतर सोपानदेव यांनी हे हस्तलिखित आचार्य अत्रे यांना दाखवले.

आचार्य अत्रे यांनी बहिणाबाईंच्या त्या सर्व कविता वाचल्या आणि उदगारले अहो हे तर बावनकशी सोने आहे! हे महाराष्ट्रापासून लपवून ठेवणे गुन्हा आहे! आचार्य अत्रेंने त्या सर्व कविता आपल्याकडे घेतले आणि ते प्रकाशित करण्याचा निर्णय घेतला. १९५२ साली आचार्य अत्र्यांनी स्वतः लिहिलेल्या प्रस्तावनेसह बहिणाबाईंच्या ३५ कविता असलेला काव्य संग्रह प्रसिद्ध केला. आचार्य अत्र्यांमुळेच या महान कवीयत्रीचा महाराष्ट्राला परिचय झाला. पुढे बहिणाबाईंच्या अनेक कविता प्रसिद्ध झाल्या. लोकप्रिय झाल्या. संपूर्ण महाराष्ट्राला बहिणाबाईंच्या काव्य प्रतिभेने भुरळ घातली. प्रत्येकाला ती आपली कविता वाटली. बहिणाबाईंच्या सर्व कविता त्यांच्या मातृभाषेत म्हणजे वऱ्हाडी - अहिराणी - खानदेशी भाषेत आहेत. त्यांच्या कवितेचा विषय सासर - माहेर, संसार, शेतीची कामे, निसर्ग, पशुपक्षी, मराठी सण - उत्सव, भाऊ, बहीण, आई, वडील असे होते. या साऱ्यांबद्दल त्यांच्या मनात विलक्षण आत्मीयता होती. हीच आत्मीयता कवितेतून झळकत होती. तल्लख स्मरणशक्ती, सूक्ष्म निरीक्षण, उपजत विनोदबुद्धी, जीवनातील सुख दुःखाकडे समभावाने पाहू शकणारे शहाणपण आणि जगण्यातून कळलेले तत्वज्ञान ही त्यांच्या काव्य प्रतिभेची वैशिष्ट्ये होती. शालेय अभ्यासक्रमात त्यांच्या अनेक कविता समाविष्ट करण्यात आल्या आहेत. अरे संसार संसार जसा तवा चुल्यावर आधी हाताला चटके तेंव्हा ( मियते ) मिळते भाकर......, खोप्यामधी खोपा सुगरणीचा चांगला देखा पिलासाठी तिने जीव झाडाले टांगला......, मन वढाय वढाय उभ्या पिकांतलं ढोर किती हाकला हाकला तरी येतं पिकांवर...... धरित्रीले दंडवत..... यासारख्या त्यांच्या कितीतरी कविता शालेय अभ्यासक्रमात समाविष्ट आहेत. या कविता न अभ्यासलेला एकही व्यक्ती महाराष्ट्रात सापडणार नाही. शाळेत जाणाऱ्या सर्व मुलांच्या या कविता तोंडपाठ आहेत. महाविद्यालयातही त्यांच्या अनेक कविता अभ्यासण्यासाठी आहेत. महाराष्ट्रातील अनेक पिढ्यांनी या कवितांचे पारायण केले आहेत. बहिणाबाईंच्या कवितांनी महाराष्ट्राच्या अनेक पिढ्यांना भुरळ घातली आहेत. महाराष्ट्राच्या साहित्य विश्वात बहिणाबाई चौधरी व त्यांच्या कविता अजरामर आहेत. मराठी साहित्य विश्वातील त्यांचे स्थान ध्रुव तात्यासारखे अढळ आहे म्हणूनच महाराष्ट्र शासनाने जळगावच्या उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे नाव कवियत्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ असे ठेवले आहे. जी व्यक्ती कधीही शाळेत गेली नाही त्या व्यक्तीचे नाव विद्यापीठाला दिले जाते यातूनच बहिणाबाईंचे श्रेष्ठत्व सिद्ध होते. आपल्या काव्य प्रतिभिने मराठी साहित्याला वेगळ्या उंचीवर नेणाऱ्या या महान कवीयत्रीचे ३ डिसेंबर १९५१ रोजी निधन झाले. आज त्यांचा ७३ वा स्मृतिदिन आहे. स्मृतिदिनी बहिणाबाई चौधरी यांना विनम्र अभिवादन!

**- श्याम ठाणेदार,दौंड जिल्हा**

# भिवंडी आगार व्यवस्थापक इब्राहिम पटेल यांच्या मनमानी कारभारामुळे प्रवाशांचे हाल


## विद्यार्थ्यांना बस अभावी करावी लागते ४-५ किलोमीटरची पायपीट

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता शहापूर ग्रामिण(नरेंद्र पाटील)**

ग्रामीण भागातल्या लोकांची लाईफ लाईन म्हणून ओळखली जाणारी एसटी महामंडळाची बस सेवा भिवंडी आगाराच्या मनमानी कारभारामुळे पुर्णतः कोलमडली असुन ग्रामीण भागातील प्रवाशांचे प्रामुख्याने शाळा कॉलेज मध्ये शिकणाऱ्या विद्यार्थीचे प्रचंड हाल होत आहेत. भिवंडी आगारातून सुटणाऱ्या भिवंडी-खंबाळा, भिवंडी-वासिंद, भिवंडी-शिरोळा,भिवंडी-करमाळा दरम्यान होणाऱ्या बसच्या फेऱ्या ह्या आता फक्त कागदावरच राहिल्या आहेत कारण भिवंडी आगार व्यवस्थापनाकडून ह्या फेऱ्या सातत्याने रद्द करुन लांब पल्ल्यासाठी बस सर्रास पाठवल्या जातात त्यामुळे बस फेऱ्यामध्ये प्रचंड अनियमितता निर्माण झाल्याने या मार्गावरुन प्रवास करणारे चाकरमानी,शेतकरी व विशेषतः शाळा कॉलेजमध्ये शिकणारे विद्यार्थी,अहिल्याबाई होळकर मोफत पास योजनेअंतर्गत पास धारक असलेल्या मुलींना प्रचंड त्रास सहन करावा लागत असून त्यांच्यामधून कमालीचा संताप व्यक्त होत आहे.सततच्या होत असलेल्या अनियमिततेमुळे या मार्गावरुन चोरट्या पध्दतीने खासगी प्रवासी वाहनांचा सुळसुळाट झाला आहे त्यामुळे खासगी चोरटी वहातूक करणाऱ्या जीप, मिनिडोअर आधीच प्रवासासाठी सुस्थितीत नाहीत त्यातच त्यांच्या वाहनांत क्षमतेपेक्षा जास्त प्रवाशी कोंबून वहातूक करत असल्याने प्रवाशांची आर्थिक लुट तर होतेच परंतु हा प्रवास सुरक्षित नसल्याने नागरीकांना नाईलाजाने जीवावर उदार होऊन प्रवास करावा लागत आहे याचे ताजे उदाहरण म्हणजे मागच्या वर्षी पडघा येथे सुस्थितीत नसलेल्या खाजगी प्रवासी वाहनाच्या भीषण अपघातात ६ निष्पाप नागरिकांचा नाहक गेलेला बळी.भिवंडी आगाराकडून शाळा कॉलेजमध्ये शिकणाऱ्या मुलींना शासनाच्या अहिल्याबाई होळकर योजनेतून मोफत पास दिले आहेत परंतु शहापूर गणेशपुरी बससेवा बंद केल्याने या मार्गावरील खंबाळा विभाग हायस्कूल व गोपीनाथ पाटील ज्युनियर कॉलेज खानिवली, सरस्वती विद्यालय वासिंद यांनी भिवंडी व शहापूर आगार व्यवस्थापनाला पत्र देऊन बस अभावी विद्यार्थ्यानींना सुमारे ५ ते ६ किलोमीटरहून जास्त अंतर पायी चालत जावे लागत असल्याने मुलींच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाल्याचे सांगितले आहे.परंतु याची कोणतीही दखल घेतली गेली नाही.याबाबत सातत्याने पाठपुरावा करणारे सामाजिक कार्यकर्ते शांताराम पाटील यांनी शहापूर आगाराच्या व्यवस्थापिका मानसी शेळके यांना प्रत्यक्ष भेटून शहापूर गणेशपुरी बस बंद केल्याने मुलींना पायी प्रवास करावा लागत असुन त्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाल्याचे सांगत मुलींना शासनाच्या मोफत पास योजनेपासून वंचित रहावे लागत असल्याने ही बस त्वरित सुरू करण्याबाबत विनंती केली परंतु मानसी शेळके यांनी सांगितले की विद्यार्थीनींनी सदरचे पास हे भिवंडी आगाराकडून घेतले असल्याने त्यांच्या प्रवासाची व्यवस्था ही भिवंडी आगारानेच करायची आहे त्यामुळे आमचा काहीही सबंध येत नाही असे संतापजनक उत्तर दिले आहे.

त्यामुळे आता प्रवाशांची व शालेय विद्यार्थ्यांची होत असलेली गैरसोय दूर होईल का? मिनीडोर,रिक्षा जीप अशी खाजगी चोरटी वाहतुक थांबून प्रवाशांची आर्थिक लुट थांबेल का? मुलींच्या सुरक्षिततेचे काय?खासगी वाहनांकडून सबंधित एसटी अधिकाऱ्याला मॅनेज केले जाते का? असे अनेक प्रश्न निर्माण झाले असुन महामंडळाच्या मनमानी कारभारामुळे प्रवाशांना होत असलेल्या त्रासाबाबत कमालीचा संताप व्यक्त होत आहे आणि याला जबाबदार सबंधित एसटी अधिकारी यांच्यावर कारवाई करण्याची मागणी केली जात आहे.

# श्रीमती के.सी.गांधी विद्यालयाचा दणदणीत विजय !



**दै.ठाणे जीवनदिप वार्ता/शहापूर ग्रामिण(नरेंद्र पाटील) :** दादोजी कोंडदेव स्टेडियम येथे पार पडलेल्या एन. टी. केळकर स्मृती चषक या १६ वर्षांखालील क्रिकेट स्पर्धेतील अंतिम सामन्यात श्रीमती के.सी.गांधीचया विद्यालय( कल्याण) या संघांनी दणदणीत विजय प्राप्त केला.

श्रीमती के.सी.गांधी या विद्यालयांनी नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी हाती घेतली. यामध्ये श्रीमा विद्यालयांनी प्रथम फलंदाजी करताना ३४ षटकात श्रीमा विद्यालय संघ ११७ धावात संपुष्टात आला. यावेळी कल्पेश मिश्रा यांनी ९ षटकात ३९ धावा देऊन ३ गडी तर अर्णव निकाळजे ९ षटकात २५ धावा देऊन ३ फलंदाज बाद केले. श्रीमा विद्यालयाचा कमेश जाधव यांनी ३९ धावा केल्या तसेच ११७ धावांचा पाठलाग करताना ३० षटकात ४ फलंदाज बाद होऊन दणदणीत विजय मिळवला. यामध्ये आयुष सायलू यांनी ५० धावा करीत या विजयात योगदान दिले.

या स्पर्धेच्या पारितोषिक वितरण प्रसंगी एमपीएल चे अध्यक्ष विहंग सरनाईक, आमदार संजय केळकर, संजय केळकर यांच्या मातोश्री ऊषा केळकर आदी पदाधिकारी उपस्थित होते. यासाठी शाळेचे व्यवस्थापक अशोक प्रधान, प्राचार्य गोविंद राजपूत, शिक्षक स्वप्नाली रानाडे, मनोहर पालन, हमंत जोशी, जयवंत पाटील यांचे सहकार्य लाभले. तर प्रशिक्षक इंद्रजित वर्मा यांनी मार्गदर्शन करून परिश्रम हाती घेतले होते.

# तेजज्ञान फाउंडेशनच्या ध्यान महोत्सवाची सांगता

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता डोंबिवली(प्रतिनिधी) :** 'हॅपी थॉट्स' नावाने ओळखल्या जाणाऱ्या तेजज्ञान ग्लोबल फाउंडेशन या आध्यात्मिक सेवाभावी संस्थेला २५ वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त वक्रतुण्ड हॉल, गणेश मंदिर संस्थान, डोंबिवली पूर्व येथे आज १ डिसेंबर ला 'रजत जयंती ध्यान महोत्सव सोहोळा' (सिल्व्हर ज्युबिली सेलिब्रेशन) आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाचे उद्घाटन सुप्रसिद्ध टेलीविजन व चित्रपट अभिनेते मा.राम अवाना, बालरोग विशेषज्ञ मा.डॉ. उल्हास कोल्हटकर व प्राचार्य डॉ. विनय भोळे यांच्या शुभ हस्ते पार पडले.कार्यक्रमाची सुरुवात तेजज्ञान फाउंडेशनच्या अमोल अंबोले आणि गोविंद बौदिया यांनी फाउंडेशनचे संस्थापक तेजगुरु सरश्री यांचा आणि त्यांच्या आध्यात्मिक कार्याचा परिचय करून देत केली. त्यांनी उपस्थितांना तेजज्ञान फाउंडेशनच्या जागतिक शांततेसाठीच्या कटिबद्धतेचा उल्लेख करत, बाहेरच्या जगतात शांतता प्रस्थापित करण्यासाठी प्रथम अंतर्मनात शांतता निर्माण करणे आवश्यक आहे, असे समजावले. जीवनात 'स्वल्पविराम' घेण्याचे महत्व पटवून देत, 'हातातील मोबाइल





काही वेळ बाजूला ठेवून ध्यानात बसल्यास, ध्यानाद्वारे आयुष्यात हा स्वल्पविराम निर्माण होईल आणि आपल्या सर्वोच्च आनंदाचा, 'स्व-अनुभव' होईल,' असे ते म्हणाले.

कार्यक्रमात तेजगुरु सरश्री यांचा ध्यानावर मार्गदर्शन करणारा व्हिडिओ संदेश दाखविण्यात आला. सरश्रींनी यात ध्यान का आणि कसे करावे, तसेच ध्यानाचे वरवरचे तसेच अंतिम लाभ म्हणजे 'मी कोण आहे?' या प्रश्नाचे उत्तर शोधणे, यावर प्रकाश टाकला. 'मी कोण आहे?' हा शोध घेणे मानवी जीवनाचे अंतिम उद्दिष्ट असल्याचे त्यांनी नमूद केले.

यावेळी सर्व उपस्थितांना २१ मिनिटांचे ध्यान अनुभवण्यासाठी मार्गदर्शन करण्यात आले, ज्यातून उपस्थितांना 'स्व-अनुभव' मिळाला.

या कार्यक्रमाला २०० पेक्षा जास्त साधक आणि नागरिक सहभागी झाले होते. उपस्थितांनी मनोभावे कार्यक्रमाचा आनंद घेतला. श्री राम अवाना तसेच डॉ. उल्हास कोल्हटकर आणि डॉ विनय भोळे यांनी आपल्या विचारांतून उपस्थितांना संबोधित केले आणि मार्गदर्शन दिले.

कार्यक्रमाचे सूत्र संचालन श्री. अमोल अंबोले यांनी रंगतदार पद्धतीने केले आणि फाउंडेशनच्या २५ वर्षांच्या प्रवासाची ओळख श्रोत्यांना करून दिली.

कार्यक्रमाच्या समारोपात, जवळपास सर्व उपस्थितांनी २१ दिवसांचे ध्यान चॅलेंज घेण्याचा संकल्प व्यक्त केला. याचबरोबर, तेजज्ञान फाउंडेशनतर्फे अशा प्रकारचे कार्यक्रम भारतातील सुमारे १२५ शहरांमध्ये आयोजित करण्यात आले आहेत, ज्यामुळे संपूर्ण देशभर ध्यानाच्या माध्यमातून शांतता आणि आनंदाचे सशक्त वातावरण निर्माण होते.

# मुख्य डाकघर पनवेल येथे डाक अदालतीचे आयोजन

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता रायगड(प्रतिनिधी) :** पोस्ट मास्टर जनरल, नवी मुंबई रिजन, २ रा माळा, पनवेल मुख्य डाकघर यांचे कार्यालयाद्वारे दिनांक १२.१२.२०२४ रोजी, सकाळी ठीक ११.०० वाजता डाक अदालतीचे आयोजन करण्यात आले आहे.

या डाक अदालतीमध्ये मुंबई रिजन विभागातील डाक सेवेसंबंधीत तक्रार / समस्या ज्याचे निवारण ६ आठवडा कालावधीत झालेले नाही, अश्या टपाल, स्पीडपोस्ट, काऊटर सेवा, बचत बैंक, मनीऑर्डर संबधित तक्रारी विचारात घेतल्या जातील. तक्रारीत सविस्तर माहिती जसे दिनांक, ज्या अधिकाऱ्याकडे मूळ तक्रार दाखल केली त्या अधिकाऱ्याचे नाव व हुद्दा इ. असणे आवश्यक आहे. इच्छूक ग्राहकांनी आपली तक्रार २ प्रतीत पोस्ट मास्टर जनरल, नवी मुंबई रिजन, २ रा माळा, पनवेल मुख्य डाकघर ४१०२०६ यांचेकडे दिनांक ०५.१२.२०२४ पर्यंत पोहचेल अश्या रितीने पाठवावी. असे अवाहन अधीक्षक डाकघर, रायगड विभाग यांनी केले आहे.

# कल्याणमध्ये महिला विशेष अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन

## रामबाग येथील श्री दत्तमंदिर देवस्थानाचे आयोजन

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता कल्याण(प्रतिनिधी) :** कल्याण पश्चिमेतील रामबाग येथील श्री दत्तमंदिर देवस्थानाच्या वतीने ३१वा श्री दत्तप्रभु जन्मोत्सव साजरा करण्यात येणार असून त्यानिमित्त महिलांना सन्मान देणारा महिला विशेष 'महिला अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जेष्ठ नेते विजय साळवी यांच्या मार्गदर्शनाखाली रविवार ८ डिसेंबर ते १५ डिसेंबर या कालावधीत हा उत्सव संपन्न होणार आहे.

महिला, स्त्री याचा समानार्थी शब्द अर्थात अष्टभुजा. सारी प्रतीके जिच्या हाती आहेत ती अष्टभुजा आणि ती अष्टावधानीच असली पाहिजे असं कायमच वाटतं. महत्वाच्या सर्व जबाबदाऱ्या पूर्वापार तिने सांभाळल्या आहेत आणि आजही त्या सर्वोत्तम पद्धतीने सांभाळते आहे. अष्टभुजा ही कालानुरूप बदलत गेली.

सारे गुणात्मक स्त्रीलिंगी शब्द हे तिचेच आहेत. तेव्हा अष्टवधान जागृत असलेली स्त्रीची आज भारतमाता विश्वपटलावर वाट पाहतो आहे. त्याचसाठी महिलांना सन्मान देण्यासाठी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या रामबाग विभागीय शाखा गेली दोन वर्ष व हे तिसरे वर्ष 'महिलांचा अखंड हरिनाम सप्ताह' आयोजित करत आहे.

या सप्ताहा दरम्यान दररोज विविध महिला किर्तनकारांच्या किर्तनाचे आयोजन करण्यात आले असून बुलढाणा येथील किर्तनकार ह.भ.प. रेणुका जाधव यांच्या श्रीमद भागवत कथेचे आयोजन करण्यात आले आहे. तर शेवटच्या दिवशी ह.भ.प. सुप्रिया साठे यांचे काल्याचे किर्तन होणार आहे. तरी सर्व भाविकांनी या अखंड हरिनाम सप्ताहात उपस्थित राहण्याचे आवाहन विजय साळवी यांनी केले आहे.

# आर्या बाबासाहेब गुंजाळ हिला १९व्या राष्ट्रीय ऐरोबीक्स स्पर्धेत रौप्य पदक





शिर्डी येथे झालेल्या राष्ट्रीय ऐरोबीक्स स्पर्धेत महाराष्ट्र संघाकडून खेळतांना आर्या गुंजाळ यांच्या ध्रुव ग्लोबल स्कूल च्या संघाने द्वितीय क्रमांक पटकावला.


फिटनेस ऐरोबीक्स सांघिक क्रीडा प्रकारात ती सहभागी झाली होती. देशभरातील राज्य या स्पर्धेत सहभागी झाले होते.

जीवनदीप शैक्षणिक संस्था,पोई संचलित
जीवनदीप कौशल्य विकास केंद्र गोवेली
कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग संचलित
प्रवेश सुरु! प्रवेश सुरु! प्रवेश सुरु!
१ बांधकाम पर्यवेक्षक (कोड नं.३०४२०२) — कालावधी १ वर्ष
२ पॅथोलॉजी टेक्नीशियन (कोड नं.२०१२३०) — कालावधी १ वर्ष
३ जनरल नर्सिंग आणि मिडवाइफरी असिस्टंट (GNMA) (कोड नं.२०१२३७) — कालावधी १ वर्ष
४ डिप्लोमा कोर्स इन मेडिकल लॅब टेक्निशियन (DMLT) (कोड नं.२०१४०४) — कालावधी २ वर्ष
५ सिक्युरिटी ॲण्ड फायर प्रिव्हिजन प्रशिक्षण (कोड नं.४११११२४) — कालावधी ६ महिने
पात्रता : १० वी / १२ वी / पदवी
संपर्क : जीवनदीप कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय गोवेली, पो.रायते, ता.कल्याण, जि.ठाणे
Call : 8108559566 / 9158518832 / 9619188558

# १२ डिसेंबरला डाक अदालतीचे आयोजन

**दैनिक ठाणे जीवनदिप वार्ता/पेण(प्रतिनिधी) :** पोस्ट मास्टर जनरल, नवी मुंबई रिजन, दुसरा माळा, पनवेल मुख्य डाकघर यांचे कार्यालयाद्वारे १२ डिसेंबरला सकाळी अकरा वाजता डाक अदालतीचे आयोजन करण्यात आले आहे. या डाक अदालतीमध्ये मुंबई रिजन विभागातील डाक सेवेसंबंधीत तक्रार / समस्या ज्याचे निवारण सहा आठवडा कालावधीत झालेले नाही, अश्या टपाल, स्पीडपोस्ट, काऊटर सेवा, बचत बैंक, मनीऑर्डर संबधित तक्रारी विचारात घेतल्या जातील.

तक्रारीत सविस्तर माहिती जसे दिनांक, ज्या अधिकाऱ्याकडे मूळ तक्रार दाखल केली त्या अधिकाऱ्याचे नाव व हुद्दा इ. असणे आवश्यक आहे. इच्छूक ग्राहकांनी आपली तक्रार दोन प्रतीत पोस्ट मास्टर जनरल, नवी मुंबई रिजन, दुसरा माळा, पनवेल मुख्य डाकघर ४१०२०६ यांचेकडे ५ डिसेंबर पर्यंत पोहचेल अश्या रितीने पाठवावी. असे अवाहन अधीक्षक डाकघर, रायगड विभाग यांनी केले आहे.





०३ डिसेंबर २०२४
मंगळवार

**मेष**
बहिणींसोबत कोणत्याही मुद्द्यावरून वाद झाला असेल तर तोही सोडवला जाईल. कुटुंबाला वेळ दिल्याने घरातील वातावरण प्रसन्न राहील.

**वृषभ**
आरोग्याच्या दृष्टीने तुम्हाला निरोगी वाटेल. काही विशेष कामासाठी प्रयत्न करत असाल तर तुम्हाला यश मिळू शकते.आजचा दिवस चांगला असेल.

**मिथुन**
तुमच्या दिनचर्येत काही बदल होईल. आज तुम्ही जोखीम घेण्यापासून मागे हटणार नाही. असे केल्याने तुम्हाला फायदा देखील होऊ शकतो.

**कर्क**
सरकारी नोकरी करणाऱ्यांना अतिरिक्त जबाबदारी मिळू शकते. आज तुम्ही एखाद्या कार्यक्रमात जाण्याचा विचार करू शकता.

**सिंह**
खूप दिवसांनी तुम्हाला बालपणीचा एखादा जुना मित्र भेटेल, ज्याला भेटून तुम्हाला आनंद होईल.काही मोठे आणि वेगळे काम करण्याचा विचार करू शकता.

**कन्या**
कुटुंबासमोर मांडण्याची पूर्ण संधी मिळेल, लोक तुमच्या योजनेने खूप प्रभावित होतील. आजचा काळ अनुकूल आहे, मेहनतीचे चांगले फळ मिळेल.

**तूळ**
कुटुंबात सुरू असलेली भांडणे बाहेरील कोणाच्याही लक्षात येऊ देऊ नका. वडिलांचा आशीर्वाद तुमच्या पाठीशी राहील. कामाच्या क्षमतेत बदल होईल.

**वृश्चिक**
मुलांशी काही वाद होण्याची शक्यता आहे, तुम्ही त्यांना समजून घेण्याचा प्रयत्न करा. ऑफिसमध्ये वरिष्ठांचे सहकार्य मिळेल,कामेही पूर्ण होतील.

**धनु**
तुम्ही आज मालमत्ता खरेदी-विक्रीचे नियोजन केले असेल तर ते पूर्ण होऊ शकते. आज कुटुंबात सुसंवाद राहील. तुमची आर्थिक बाजू मजबूत राहील.

**मकर**
तुमच्या वागण्यातून लोकांमध्ये समन्वय राखाल. जवळच्या मित्राचा सल्ला तुमच्यासाठी उपयुक्त ठरेल. कुटुंबासोबत घरी चित्रपट पाहण्याचा बेत करू.

**कुंभ**
काही नवीन कल्पनांवरही काम कराल. आनंदाची बातमी मिळेल, विरोधी पक्ष तुमच्यापुढे झुकेल आणि तुमचे सोशल नेटवर्क मजबूत होईल.

**मीन**
स्पर्धा परीक्षांची तयारी करणारे विद्यार्थी त्यांच्या गंतव्यस्थानापर्यंत पोहोचण्यात यशस्वी होतील. डोळ्यांच्या समस्यांनी त्रस्त असलेल्यांनी डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.

# सदस्य नोंदणी अभियानाच्या प्रदेश सहसंयोजक पदी नरेंद्र पवार यांची नियुक्ती




**दै.ठाणे जीवनदिप वार्ता/कल्याण(प्रतिनिधी) :** भारतीय जनता पक्षातर्फे आगामी काळात संपूर्ण भारतभर सदस्य नोंदणी अभियान राबविण्यात येणार असून त्यामध्ये वसई विरार जिल्ह्यातून किमान ५ लाख सदस्य नोंदणीचे करण्याचे आवाहन भाजपच्या संघटन पर्व २०२४ सदस्य नोंदणी मोहिमेचे प्रदेश सहसंयोजक माजी आमदार नरेंद्र पवार यांनी केले आहे. या सदस्य नोंदणी मोहिमेच्या पार्श्वभूमीवर नालासोपारा येथे झालेल्या वसई विरार जिल्ह्याच्या प्राथमिक बैठकीत त्यांनी हे ५ लाख सदस्य नोंदणीचे लक्ष्य निर्धारित केले.


येत्या काही महिन्यांमध्ये महापालिकांच्या सार्वत्रिक निवडणूकीचे बिगुल वाजणार आहे. आधी लोकसभा निवडणुकांतील विजय, त्यानंतर नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीतील निर्भेळ यश पाहता येणाऱ्या महापालिका निवडणुकांमध्येही भारतीय जनता पक्षाची अशीच विजयी घोडदौड कायम राहणे आवश्यक असल्याचे मत नरेंद्र पवार यांनी यावेळी व्यक्त केले. या पार्श्वभूमीवर राज्यामध्ये प्रदेश भाजपतर्फे संघटन पर्व - २०२४ या सदस्य नोंदणी मोहिमेला प्रारंभ होत आहे. या मोहिमेमध्ये भाजपच्या वसई विरार जिल्ह्यातून किमान ५ लाख सदस्य नोंदणीचे लक्ष्य गाठण्याचे आवाहन नरेंद्र पवार यांनी या बैठकीत केले. तर विधानसभा निवडणुकीतील भाजप आणि महायुतीच्या घवघवीत विजयाबद्दल भाजपच्या वसई विरार जिल्हा पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांकडून पवार यांचा अभिनंदनपर सत्कार करण्यात आला.

विधानसभा निवडणुकीत माजी आमदार नरेंद्र पवार यांच्यावर कल्याण पश्चिम आणि उल्हासनगर या दोन विधानसभांची जबाबदारी सोपवण्यात आली होती. नरेंद्र पवार यांनी उत्कृष्ट संघटन कौशल्य आणि दांडग्या जनसंपर्काच्या जोरावर या दोन्ही ठिकाणी महायुतीच्या उमेदवारांच्या विजयामध्ये मोठी भूमिका बजावली. त्याची दखल घेऊन भाजप पक्षश्रेष्ठींकडून नरेंद्र पवार यांची संघटन पर्व २०२४ या सदस्य नोंदणी मोहिमेच्या प्रदेश सह संयोजकपदी नियुक्ती केली आहे. ज्याअंतर्गत त्यांच्याकडे ठाणे विभागाच्या ९ जिल्ह्यांतील भाजप सदस्य नोंदणीची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. त्याचाच एक भाग म्हणून नालासोपारा येथे त्यांच्या मार्गदर्शनाखाली वसई विरार जिल्ह्याची बैठक संपन्न झाली.

यावेळी नालासोपारा विधानसभा आमदार राजन नाईक, वसई विधानसभा आमदार स्नेहा दुबे यांच्यासह भाजपा प्रदेश सचिव व जिल्हा प्रभारी राणी द्विवेदी, ठाणे विभाग संघटनमंत्री हेमंत म्हात्रे, वसई विरार जिल्हा अध्यक्ष महेंद्र पाटील, वसई विधानसभा निवडणूक प्रमुख मनोज पाटील, युवा मोर्चा प्रदेश सचिव अशोक शेळके, सरचिटणीस प्रज्ञा पाटील, अभय कक्कड, विश्वास सावंत, जे.पी. सिंह तसेच प्रदेश पदाधिकारी, जिल्हा पदाधिकारी, जिल्हा मोर्चा आघाडी अध्यक्ष सरचिटणीस, मंडळ अध्यक्ष व सरचिटणीस यांच्यासह भाजपा पदाधिकारी आणि मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते.

# डॉ. राजेंद्र प्रसाद जयंती

(३ डिसेंबर १८८४-२८ फेब्रुवारी १९६३)



डॉक्टर राजेंद्र प्रसाद हे एक प्रख्यात स्वातंत्र्य सैनिक, मानवतावादी उत्कृष्ट राजकारणी, कायदेतज्ञ, उत्तम संसदपटू, एक सक्षम प्रशासक, भारतीय संस्कृतीचे जाणकार आणि भारताचे पहिले राष्ट्रपती म्हणून प्रसिद्ध आहेत. त्यांचा जन्म ३ डिसेंबर १८८४ रोजी बिहारच्या सिवान जिल्ह्यातील 'जीरदेई 'या गावी झाला.

त्यांचे वडील महादेव सहाय आणि आई कमलेश्वरी देवी यांनी त्यांच्यावर लहानपणापासूनच उत्तम संस्कार केले. त्यामुळे राजेंद्र बाबूंचे मन समृद्ध व सुसंस्कृत बनले होते. पाच वर्षाचे असताना त्यांची मुळाक्षरांची ओळख सुरू झाली. त्यांचे शिक्षण दोन मौलवींच्या हाताखाली झाले. त्यांचे इंग्रजी शिक्षण छपरा येथे झाले. शालेय शिक्षणास सुरुवात झाल्यावर ते नेहमी शाळेत प्रथम क्रमांक मिळवत. १८९७ मध्ये त्यांचा विवाह राजबन्स देवी यांचेशी झाला होता. त्यांच्या शिक्षकांना त्यांच्याबद्दल अभिमान होता. महाविद्यालयात देखील हुशार आणि गुणग्राही विद्यार्थी म्हणून ते प्रसिद्ध झाले होते. एम. ए.च्या परीक्षेत प्रथम वर्गात ते उत्तीर्ण झाले.काही काळ त्यांनी महाविद्यालयात अध्यापनाचे कार्य केले. मात्र त्यांना सरकारी नोकरी करावयाची नव्हती. मास्टर ऑफ लॉ परीक्षा ते प्रथम वर्गात उत्तीर्ण झाले. त्यानंतर पुढील दोन वर्षात त्यांनी डॉक्टर ऑफ लॉज ही कायद्याची सर्वोच्च पदवी मिळविली. तेव्हा पासून ते कायमचे डॉक्टर राजेंद्र प्रसाद झाले. तदनंतर ते कलकत्ता येथे वकिली करू लागले. तसेच पाटणा येथेही त्यांनी वकिली केली. गरजू लोकांना ते मदत करीत असत त्यांचे राहणीमान अगदी साधे होते. समाज बांधवांबद्दल त्यांच्या मनात नेहमी दयेची भावना असायची.


१९१७ साली महात्मा गांधी चंपारण्य येथे सत्याग्रह करण्यासाठी गेले. राजेंद्र बाबूंनी देखील सत्याग्रहात भाग घेतला.

१९१९ मध्ये भारतावर मुद्दाम लादलेला जुलमी रौलेट कायदा रद्द व्हावा म्हणून देशव्यापी चळवळ सुरू झाली. सदर चळवळीत सुद्धा राजेंद्र बाबूंनी भाग घेतला. त्यांनी वकिली सोडून दिली. देश हिताचा विचार केल. देशाला स्वातंत्र्य मिळाले पाहिजे अशी त्यांची तीव्र इच्छा होती.

राजेंद्र प्रसाद यांनी पुढे राष्ट्रीय विद्यापीठाची स्थापना केली. १९३० सालच्या कायदेभंगाच्या चळवळीत त्यांनी उडी घेतली. भारत छोडो आंदोलनात भाग घेतला. त्यांना तुरुंगात भोगावा लागला. १५ जून १९४५ रोजी त्यांची सुटका झाली. १९४६ साली पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या मध्यवर्ती हंगामी सरकारात राजेंद्र प्रसाद अन्न मंत्री होते. ९ डिसेंबर रोजी स्वतंत्र भारताची राज्यघटना तयार करण्यासाठी घटना समिती स्थापन करण्यात आली. त्या समितीचे अध्यक्ष म्हणून राजेंद्र प्रसाद यांची नियुक्ती करण्यात आली होती. या समितीने अपार कष्ट घेऊन राज्यघटना तयार केली.

१९४७ ला भारताला स्वातंत्र्य मिळाले. १९५० ला ते प्रजासत्ताक भारताचे पाहिले राष्ट्रपती झाले.

अनेक देशांचा त्यांनी प्रवास केला. 'द्विखंड भारत' व 'आत्मकथा' ही त्यांची दोन पुस्तके अतिशय गाजली. 'सर्चलाइट' या इंग्रजी दैनिकाचे व 'देश' या हिंदी साप्ताहिकाचे ते संपादक होते. साधी राहणी आणि उच्च विचारसरणी हे राजेंद्र बाबू यांचे वैशिष्ट्य होते. मे १९६२ ला राष्ट्रपती पदावरून ते निवृत्त झाले.त्याच वर्षी त्यांना 'भारतरत्न' हा सर्वश्रेष्ठ पुरस्कार भारत सरकारने प्रदान करून त्यांचा बहुमान केला. २८ फेब्रुवारी १९६३ रोजी त्यांचे निधन झाले.राष्ट्रकवी मैथिलीशरण गुप्त त्यांच्या विषयी लिहितात; देशने तुमको बनाया राष्ट्रपती श्रीमंत,उभय रूपोमें हमारे पूज्य तुम राजेंद्र, किन्तु अपने आपको तुमने बनाया संत। धन्य है तुमसे हमारे देश, काल, दिगना।।



डॉ. आनंदराव सूर्यवंशी

### नांदिवली, भोपर, आणखी ग्रामीण भागातील
# पाणी समस्या दोन महिन्यात संपणार



**दै.ठाणे जीवनदिप वार्ता/ कल्याण(प्रतिनिधी) :** कल्याण ग्रामीणचे नवनिर्वाचित आमदार राजेश गोवर्धन मोरे यांनी कामाचा सपाटा लावला असून, कल्याण ग्रामीण भागातील नागरिक सुद्धा राजेश मोरे यांच्याकडे समस्या सोडवण्यासाठी रांगा लावत आहे आमदार मोरे प्रत्येक व्यक्तीला वेळ देऊन त्याचे सर्व प्रश्नांवर ताबडतोब त्यावर उपाय योजना करतात आणि संबंधित महापालिका अधिकाऱ्यांशी चर्चा करून प्रश्न निकाली काढतात.

नांदिवली ग्रामीण भागातील शिवसेना पदाधिकारी अनिल म्हात्रे साहेब यांनी नवनिर्वाचित आमदार राजेश मोरे यांची भेट घेऊन प्रभागाची पाणी समस्यांच्या बाबतीत चर्चा केली यावेळी आमदारांनी सर्वांना आश्वासित केले की आपली पाणी समस्या दोन महिन्याच्या संपुष्टाची तुम्ही थोडा धीर धरा पाच वर्षे धीर धरला ना आता थोडा वेळ धीर धरा तुमचा प्रश्न नक्की सोडवेल

यावेळी सर्व नागरिकांचे समाधान झाले आणि त्यांनी राजेश मोरे पुष्पगुच्छ देऊन आपल्या आनंदाच्या भावना व्यक्त केल्या.

# बाळ आनंद मेळावा व क्रीडा महोत्सव साजरा



**दै.ठाणे जीवनदिप वार्ता/ वासिंद(नरेंद्र पाटील) :** वासिंद येथील जी.डी.कंठे इंग्लिश मीडियम स्कूल या शाळेचा बाळ आनंद मेळावा व क्रीडा महोत्सव अतिशय उत्साहात पार पडला.गणेश कृपा संस्थेचे संस्थापक स्वर्गीय गुरुनाथजी कंठे यांच्या जयंतीनिमित्त जी.डी.कंठे इंग्लिश मीडियम स्कूल या शाळेचा बाळ आनंद मेळावा तसेच क्रीडा महोत्सव मोठ्या आनंदाने साजरा करण्यात आला.या कार्यक्रमावेळी संस्थेचे सचिव शैलेश कंठे, कार्याध्यक्षा दीप्तीताई कंठे, शाळेचे मुख्याध्यापक योगेश भोईर यांनी उपस्थिती दर्शवून विद्यार्थ्यांना खेळाचे महत्व सांगून योग्य ते मार्गदर्शन केले.

# नायलॉन मांजाचा घाऊक व किरकोळ विक्री आणि साठा न करण्याचे आवाहन

ठाणेः नायलॉन मांजामुळे पक्ष्यांना व मानवांना गंभीर इजा होण्याची शक्यता असते. पतंग उडवणाऱ्या सणांमध्ये अशा धाग्यांचा घाऊक/किरकोळ विक्रेते/ साठा करण्यास प्रतिबंध घालण्यात आला आहे. त्यामुळे नायलॉन मांजाचा वापर करू नये, असे आवाहन जिल्हा प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे. मा. उच्च न्यायालय,नागपूर खंडपीठाने २०२१ च्या सुमोटो जनहित याचिका क्रमांक ०१/२०२१ मध्ये नायलॉन मांजा संबंधित मुद्यांची दखल घेतली आहे.'नायलॉन मांजा' हा विशेषतः पतंग उडवणाऱ्या सणांमध्ये वापरात आणला जात असून नायलॉन मांजामुळे पक्ष्यांना व मानवांना गंभीर इजा होण्याची शक्यता असते. त्यामुळे अशा धाग्यांचा घाऊक / किरकोळ विक्रेते / साठा करणाऱ्यांना थांबवून या मांजाची साठा, विक्री होणार नाही याची दक्षता घेण्याबाबत जिल्ह्यातील विविध विभागांना निर्देश दिले आहेत. त्या अनुषंगाने जिल्ह्यामध्ये नायलॉन मांजा धाग्यांचा घाऊक / किरकोळ विक्रेते / साठा करणाऱ्यांना प्रतिबंध करुन या मांजाचा साठा, विक्री होणार नाही याची खबरदारी घ्यावी, असे आवाहन उपजिल्हाधिकारी (सा.प्र.) हरिश्चंद्र पाटील यांनी केले आहे.

# कॅप्टन चांगला असला की सैन्य देखील चांगलं लढतं

### - आमदार विश्वनाथ भोईर



शिवसेना ठाणकर पाडा शाखेच्यावतीने करण्यात आला आमदारांचा भव्य नागरी सत्कार

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता/ कल्याण(प्रतिनिधी) :** कॅप्टन चांगला असला की सैन्य देखील चांगलं लढतं याचा प्रत्यय विधानसभा निवडणुकीत आला असून शिवसेना ठाणकर पाडा विभागीय शाखेने आपल्या निवडणुकीत ठाणकर पाडा, बेतूरकर पाडा, आधारवाडी, फडके मैदान, काळा तलाव या प्रभगात चांगले मताधिक्य मिळाले. या ठिकाणी प्रचाराचे संपूर्ण नेतृत्व उपशहर प्रमुख तथा माजी नगरसेवक मोहन उगले यांनी केले.

त्यांच्या नेतृत्वाखाली सर्व पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी चांगला प्रचार केल्याने आपला विजय सुकर झाला. त्यामुळे मोहन उगले यांच्यासारखा कॅप्टन चांगला असला की सैन्य देखील चांगलं लढतं असे गौरव उद्गार उगले यांच्याबद्दल आमदार विश्वनाथ भोईर यांनी व्यक्त केले.

कल्याण पश्चिमचे आमदार विश्वनाथ भोईर यांचा भव्य नागरी सत्कार शिवसेना शाखा ठाणकर पाडा यांच्यावतीने आयोजित करण्यात आला होता. त्याप्रसंगी माजी नगरसेवक जयवंत भोईर, महिला शहर संघटक नेत्रा उगले, उपशहर प्रमुख मोहन उगले, शाखा प्रमुख नितीन कदम, शरद आव्हाड, धर्मेंद्र भदोरिया, उपविभाग प्रमुख स्वप्निल मोरे, संदीप पगारे, उमेश भुजबळ, पिंटू दुबे, राजेश साबळे, बबन बिन्नर तसेच महिला आघाडी आणि प्रभागातील नागरिक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.यावेळी मोहन उगले आणि नेत्रा उगले यांनी आमदारांचे स्वागत करत, गेल्या ५ वर्षात आमदारांनी या प्रभागाला दिलेल्या भरगोस निधीमुळे नागरिकांची मोठ्या प्रमाणात कामं झाली असून यामुळे केलेल्या कामांच्या जोरावर मत मागायला गेलो असल्याचे सांगितले. तसेच पुढील काळात देखील ठाणकर पाडा विभागीय शाखे अंतर्गत असलेल्या सर्व प्रभागातील नागरिक आपल्या सोबत असल्याचे आश्वासन दिले. तर आमदार विश्वनाथ भोईर यांनी बोलतांना आपल्या भाषणात सांगितले कि, सर्वांचे अंदाज २० ते २५ हजार मताधिक्याचा होता पण पाठीशी लाडक्या बहिणी होत्या त्यामुळे आपल्याला ४२ हजारांचे मताधिक्य मिळाले. बहिणींनी गनिमी कावा करून एकनाथ शिंदे यांच्या सर्व शिलेदारांना निवडून आणलं.

कटेंगे तो बटेंगे या फतव्याच्या विरुद्ध सर्व एकत्र झाले त्यामुळे मतदान वाढले.वाढलेल्या या मतदानात ठाणकर पाड्याचा मोठा सहभाग होता. उगले यांनी जी जी कामं सांगितली ती ती पूर्ण केली आहेत. या कामांच्या जोरावर ४२ हजारांचे मताधिक्य वाढले.आपण तक्रार आणा त्याचे निवारण १०० टक्के होणार ती माझी जवाबदारी. आपण दोन महिने माझ्यासाठी दिले आता मी पुढील ५ वर्षे तुमच्यासाठी देणार. शिवसैनिक आणि जिद्द हे एकाच नाण्याच्या दोन बाजू असून आपण जिद्दीने काम केलं. बहिणींनी जो आशीर्वाद दिला तो आशीर्वाद कामी आला असल्याचे यावेळी भोईर यांनी सांगितले.

# आर एस पी युनिट कमांडर डॉ.मनिलाल शिंपी 'वसंत स्मृती आदर्श शिक्षक पुरस्कार २०२४'ने सन्मानित




**दै.ठाणे जीवनदिप वार्ता/ठाणे(प्रतिनिधी) :** दि.१/१२/२४ रविवार रोजी एम एच हायस्कूलचे ठाणे येथे भारतीय जनता पार्टी शिक्षक आघाडी कोकण विभाग व समन्वय प्रतिष्ठानचे अध्यक्ष कोकण पदवीधर मतदार संघाचे आमदार अँड.निरंजनजी डावखरे यांच्या संकल्पनेतून'वसंत स्मृती आदर्श शिक्षक पुरस्कार २०२४,' सोहळा उत्साहात साकारला. ठाणे पालघर नाशिक विभागीय आर एस पी अधिकारी शिक्षक युनिट कमांडर व मानव सेवा हीच खरी ईश्वर सेवा ग्रुपचे राज्यप्रमुख डॉ. मनिलाल रतिलाल शिंपी यांना त्यांच्या सामाजिक व क्रीडा क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीबद्दल वसंत स्मृती आदर्श शिक्षक पुरस्कार २०२४,' ठाणे येथील तिसऱ्यांदा बहुमताने निवडून आलेले आमदार संजयजी केळकर व कोकण पदवीधर आमदार ॲड. निरंजन डावखरे यांच्या हस्ते सन्मानपूर्वक देण्यात आला.

यावेळी ठाणे नवी मुंबई पालघर नाशिक विभागाचे विभागीय आर एस पी समादेशक श्री. दिलीप स्वामी यांच्या प्रमुख उपस्थितीत ठाणे शहर समादेशक, एम एच हायस्कूल चे मुख्याध्यापक श्री.सुनील पाटील, ठाणे जिल्हा अतिरिक्त समादेशक डॉ.जितेंद्र सोनवणे, भिवंडी शहापूर तालुका समादेशक श्री. मंगेश भामरे,ठाणे जिल्हा उपसमादेशक श्री.विनोद शेलकर,अंबरनाथ बदलापूर चे श्री.दत्तात्रय पाटील, मुख्याध्यापक, व आर एस पी अधिकारी श्री. दत्तात्रय पटवर्धन, टिटवाळा परिसराचे समादेशक श्री.विजय भामरे, आर एस पी अधिकारी श्री. गोकुळ गवळे,श्री मधुकर पाटील, श्री करणसिंह जडेजा, श्री. पवार सर, श्री. सुनील कोळी, घाटकोपर समादेशक श्री.तुकाराम साळुंखे, श्री. मारुती जाधव यांच्यासह महाराष्ट्र राज्य रस्ता सुरक्षा दल व नागरी संरक्षण संघटना नागपूर अंतर्गत असलेल्या सर्व अधिकाऱ्यांनी केलेल्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल व विधानसभा निवडणुकीत जिल्हाधिकारी ठाणे यांचा आदेशानुसार निवडणूक अधिकारी व विशेष पोलीस अधिकारी म्हणून उत्कृष्ट रित्या कर्तव्य करत प्रशासनाला निवडणूक कामात मोलाचे योगदान दिले त्याबद्दल भारतीय जनता पार्टी शिक्षक आघाडी कोकण विभाग व समन्वय प्रतिष्ठान यांच्यावतीने संपूर्ण आर एस पी अधिकारी शिक्षक युनिटचे कोकण विभागाचे लोकप्रिय पदवीधर आमदार आदरणीय अँड. निरंजनजी डावखरे, विद्यमान नवनिर्वाचित तिसऱ्यांदा ठाण्यातून बहुमताने निवडून आलेले आमदार श्री.संजयजी केळकर साहेब, तसेच कोकण विभागाचे लाडके आणि शिक्षकांची सावली असणारे आमचे ज्ञानेश्वर माऊली आदरणीय शिक्षक आमदार श्री ज्ञानेश्वर म्हात्रे सर यांनी विशेष कौतुक आणि अभिनंदन केले. महाराष्ट्र राज्य रस्ता सुरक्षा दल व नागरी संरक्षण संघटनेचे अध्यक्ष श्री संजय शेंडे, उपाध्यक्ष श्री. पी एस महाजन, सचिव श्री. श्याम फाळके, प्रशिक्षण प्रमुख श्री. पोहरे सर, कायदेविषयक राज्य सल्लागार अँड.के.डी.पाटील, प्रसिद्धी प्रमुख दैनिक स्वराज्य तोरण चे संपादक डॉ. किशोर बळीराम पाटील यांच्यासह अहिल्यानगर बीड विभागीय समादेशक डॉ. सिकंदर शेख, डॉ. सोमनाथ बोंतले यांनीही 'वसंत स्मृती आदर्श शिक्षक २०२४ चे समानार्थी डॉ. मणिलाल शिंपी यांच्यासह संपूर्ण आरएसपी अधिकारी टीमचे अभिनंदन आणि कौतुक केले आहे.भारतीय जनता पार्टी शिक्षक आघाडीचे कोकण विभाग प्रदेश संयोजक श्री. विकास पाटील, प्रदेश कार्यकारणी सदस्य श्री एन एम भामरे, संयोजक श्री. किशोर पाटील, कोकण पदवीधर प्रकोष्ट संयोजक श्री.सचिन मोरे, व सहसंयोजक उत्कृष्ट निवेदक श्री विनोद शेलकर यांच्यासह कोकण विभाग भाजपा शिक्षक आघाडी कडून संपूर्ण आर एस पी अधिकारी शिक्षक युनिट ला पुढील काळात यशस्वी वाटचालीसाठी शुभेच्छा देत अभिनंदन केले.

# काजूच्या वाडीत ग्राम संवर्धन सामाजिक संस्थेच्या वतीने वनराई बंधारा

### आदिवासी बांधवांना होणार फायदा





**दैनिक ठाणे जीवनदिप वार्ता/पेण(प्रतिनिधी) :** ग्राम संवर्धन सामाजिक संस्थेच्या वतीने १ डिसेंबर रोजी पेण तालुक्यातील ग्रुप ग्राम पंचायत बोरगाव हद्दीतील काजूच्या वाडी शेजारी असलेल्या नैसर्गिक नाल्यावर सुमारे तीस मीटर लांबीचा वनराई बंधारा बांधून लाखो लिटर पाणी अडविण्याचे कार्य केले आहे.

एकीकडे पिण्याच्या पाण्याचे दुर्भिक्ष असतानाही काजूच्या वाडीतील आदिवासी बांधव अतिशय मेहनत करून भाजीपाला लागवडीतून आपला उदरनिर्वाह चालवतात त्यांना मदतीचा हात म्हणून वाडी शेजारी असलेल्या नैसर्गिक जल स्रोतावर ग्राम संवर्धन सामाजिक संस्थेने वनराई बंधारा बांधून दिला. ज्यामुळे लाखो लिटर पाण्याची साठवण होऊन ते पाणी या आदिवासी शेतकऱ्यांना भाजीपाला लागवडीसाठी उपयोगी येईल. ह्या उपक्रमात रॅलीस इंडिया, ग्राम संवर्धनचे संस्थापक अध्यक्ष सामाजिक कार्यकर्ते संतोष ठाकूर, राजू पाटील, मानसी पाटील, राजेश रसाळ आणि आदिवासी बांधवांनी आपले योगदान दिले दरम्यान ग्राम संवर्धन सामाजिक संस्था पाणीटंचाई असलेल्या वाड्यावर वस्त्यांवर पाणलोट क्षेत्र विकासाच्या माध्यमातून अनघड दगडी बंधारे, नैसर्गिक जल साठ्यांचे खोलीकरण, सी.सी.टी.बंधारे, डोंगर माथ्यावर किंवा उतारावर चर खोदून पाणी अडवून जमिनीत जिरवण्याचे काम करीत असून संस्थेच्या ह्याच जल संवर्धनाच्या कार्याची दखल घेवून रायगड जिल्हा परिषदेकडून सन्मानीतही करण्यात आले आहे.

# रिकव्हर केलेले नऊ मोबाईल तक्रारदारांना परत







**दै.ठाणे जीवनदिप वार्ता/ शहापूर ग्रामिण(नरेंद्र पाटील) :** ठाणे ग्रामीण जिल्ह्यातील मिसिंग झालेले अनेक मोबाईल रिकव्हर करून गणेशपुरी पोलीस ठाण्यात तक्रार करण्यात आलेल्या व्यक्तींना त्यांचे मोबाईल परत मिळवून दिल्याने तक्रारदारांनी आनंद व्यक्त करून पोलीस यंत्रणेचे आभार मानले आहेत.याबाबत पोलिस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार ठाणे ग्रामीण भागातून अनेक मोबाईल चोरीच्या घटना घडल्या होत्या यासाठी ठाणे ग्रामीणचे पोलीस अधीक्षक डॉक्टर डी एस स्वामी, अप्पर पोलीस अधीक्षक भारत तांगडे, उपविभागीय पोलीस अधिकारी राहुल झाल्टे यांनी मार्गदर्शनपर सूचना केल्यानंतर गणेशपुरी पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी संदिपान सोनवणे यांच्या नेतृत्वाखाली पथक तयार करून तांत्रिक विश्लेषण केले यामध्ये तयार केलेल्या पथकाने संदिपान सोनवणे यांच्या नेतृत्वाखाली चमकदार कामगिरी करत चोरीला गेलेले व गहाळ झालेले एकूण नऊ मोबाईल मिळविण्यात यश प्राप्त केले गणेशपुरी पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी संदिपान सोनवणे यांना प्रशासनातील दांडगा अनुभव असल्याने व आपल्या चाणाक्ष बुद्धीचा वापर करून पोलीस हवालदार राजेंद्र शेंडे, रवींद्र शेलार व इतर पोलीस कर्मचाऱ्यांचे पथक तयार करून त्यांना योग्य त्या सूचना दिल्या त्यात या पथकाने चोरीला गेलेले व गहाळ झालेले नऊ मोबाईल मिळवण्यात यश संपादन केले हे सर्व रिकव्हर केलेले मोबाईल संबंधित तक्रार करणाऱ्या व्यक्तींना दिनांक २६/११/ २४ रोजी पोलीस ठाण्यात बोलावून हस्तांतरित केले यावेळी उपस्थित तक्रारदारांनी संबंधित अधिकारी व कर्मचारी यांचे विशेष आभार मानले . तसेच पोलीस ठाण्यात असलेल्या तक्रारींची तातडीने दखल घेऊन अनेक घटना उजेडात आणण्याचे सुतोवाच गणेशपुरी पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी संदिपान सोनवणे यांनी बोलताना स्पष्ट केले.

## उच्च न्यायालयाच्या आदेशानंतर...

पान १ वरून ▶▶ आदेशावरून शुभारंभ हॉलवर कारवाई सुरू केली.

गोळवली गाव हद्दीत मदन गुप्ता यांच्या मालकीचा तीन माळयाचा वाणीज्य वापराचा शुभारंभ बॅन्क्वेट हॉल होता. हे बांधकाम बेकायदा असल्याच्या तक्रारी माहिती कार्यकर्त्या प्रीती कुथे यांनी पालिका आयुक्त ते आय प्रभागाच्या साहाय्यक आयुक्तांकडे मागील दोन ते तीन वर्षात केल्या होत्या. यापूर्वी दोन वेळा या बांधकामावर कारवाई झाली होती. सततचा पाठपुरावा करूनही पालिकेकडून कारवाई होत नसल्याने माहिती कार्यकर्त्या कुथे यांनी ॲड. निखील वाजे, ?ड. वीरेन तपकीर यांच्या साहाय्याने उच्च न्यायालयात याचिका करून, हे बेकायदा बांधकाम तोडण्याची मागणी केली होती.

न्यायालयाने सर्व बाजू ऐकून हे बांधकाम बेकायदा असल्याचा निष्कर्ष काढून चार महिन्यापूर्वी हे बांधकाम तोडण्याचे आदेश पालिकेला दिले होते. त्यावेळी हॉल मालकाकडून काही आक्षेप घेण्यात आले होते. न्यायालयाने तोडकामाला अंतरिम स्थगिती दिली होती. शुभारंभ हॉलचे प्रकरण गेल्या आठवड्यात पुन्हा सुनावणीला आले. न्यायालयाने शुभारंभ हॉलचा सक्षम प्राधिकरणाने मंजूर केलेला इमारत बांधकाम आराखडा सादर करण्याचे आदेश हॉल मालकाची बाजू मांडणाऱ्या वकिलांना दिले. गोळवली ग्रामपंचायतीने बांधकामाला मंजुरी दिल्याची ठरावाची प्रत न्यायालयाला दाखविण्यात आली. न्यायालयाने ही परवानगी बोगस असल्याचा निष्कर्ष नोंदविला. त्यानंतर पालिकेच्या वकिलाने येत्या दोन दिवसात हे बांधकाम तोडण्यात येईल, असे आश्वासन न्यायालयाला दिले.

साहाय्यक आयुक्त भारत पवार यांनी जेसीबी, तोडकाम पथकाच्या साहाय्याने बेकायदा हॉल तोडण्याची कारवाई शनिवारी सुरू केली. सोमवारी शक्तिमान कापकाम यंत्राच्या साहाय्याने शुभारंभ हॉल भुईसपाट करण्यात आला.

गोळवली ग्रामपंचायतीची बांधकाम परवानगी घेऊन शुभारंभ हॉलची उभारणी करण्यात आली होती. हॉल मालक मदन गुप्ता या बनावट कागदपत्रांवर विसंबून होते, न्यायालयाने या बेकायदेशीर कृत्यावर टीका केली. न्यायालयाने हे बांधकाम बेकायदा असल्याचा निष्कर्ष नोंदविला. त्यामुळे हॉलवर कारवाई झाली.-ॲड. निखील वाजे, याचिकाकर्ता वकील.

**उच्च न्यायालयाने शुभारंभ हॉल बेकायदा असल्याचा आदेश दिल्याने, न्यायालयाच्या आदेशावरून आयुक्त, उपायुक्तांच्या मार्गदर्शनाखाली हे बेकायदा बांधकाम भुईसपाट करण्यात आले.- भारत पवार साहाय्यक आयुक्त, आय प्रभाग, कल्याण.**

## सिडकोच्या सागरी महामार्गावर खड्डे
### अपघाताची शक्यता

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता प्रतिनिधी**

**उरण :** सिडकोच्या द्रोणागिरी ते पागोटे या सागरी महामार्गावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडले आहेत. या मार्गाची दुरुस्ती मे २०२४ मध्ये करण्यात आली आहे. मात्र अवघ्या काही महिन्यांतच हा मार्ग नादुरुस्त झाला आहे. यात जड कंटेनर वाहनांची संख्या जास्त असल्याने खोपटे पूल चौकात पडलेले खड्डे धोकादायक बनले आहेत. या मार्गावरील खडी उखडल्याने दुचाकीवरून प्रवास करणाऱ्या वाहन चालकांना अपघात होऊ लागले आहेत.

नवी मुंबईत जाणाऱ्या दुचाकीस्वाराचा तोल गेल्याने कंटेनर वाहनाखाली तो येता येता वाचला. गुरुवारी ही घटना घडली. तर याच चौकात एसटी बस आणि रिक्षा यांचा अपघात झाला होता. द्रोणागिरी नोड ते खोपटे पूल चौक या मार्गावरही खड्डे पडले आहेत. या मार्गावरील पथदिवे बंद असल्याने प्रवाशांना अंधार आणि खड्डे यांचा सामना करावा लागत आहे. उरणच्या जेएनपीटी ते पळस्पे या राष्ट्रीय महामार्गाला हा सागरी महामार्ग जोडण्यात आला आहे. त्यामुळे जेएनपीटी बंदरातून खोपटे आणि उरणच्या पूर्व विभागातील अनेक गोदामात ये-जा करणाऱ्या हजारो जड कंटेनर वाहनांमुळे हा मार्ग सतत वर्दळीला बनला आहे.

## खासदार बाळ्या मामा फडणवीसांच्या भेटीसाठी...

पान १ वरून ▶▶ चर्चांना उधाण आले आहे. येत्या ५ तारखेला मुंबईतील आझाद मैदानात महायुती सरकारचा शपथविधी होणार असल्याची माहिती आहे. त्यादृष्टीने आझाद मैदानात तयारीही सुरु झाली आहे. यावेळी भाजपचे राज्यातील पहिल्या क्रमांकाचे नेते देवेंद्र फडणवीस हे मुख्यमंत्रि?पदाची शपथ घेतील, हे आता जवळपास निश्चित आहे. त्यामुळे सोमवारी सकाळपासून सागर बंगल्यावर लगबग दिसत आहे. मंत्रीपदासाठी चर्चेत असणाऱ्या नेत्यांनी सागर बंगल्यावर आज फडणवीसांची भेट घेतली. यामध्ये माधुरी मिसाळ, चंद्रकांत पाटील, राहुल नार्वेकर, अतुल सावे, प्रतापराव चिखलीकर ,चंद्रशेखर बावनकुळे आणि गिरीश महाजन यांचा समावेश आहे.

**अजितदादांचा सोनेरी काळ सुरु**

राज्यात महायुतीचे सरकार आल्यानंतर अजित पवार यांच्या पक्षाला 'अच्छे दिन' येणार असल्याची चाहुल लागली आहे. कारण शरद पवार गट आणि ठाकरे गटातील काही नेते अजितदादांच्या राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये सामील होण्याची शक्यता आहे. शरद पवार गटातील राहुल जगताप आणि मानसिंग नाईक हे अजितदादांच्या गटात जाणार असल्याची माहिती आहे. राहुल जगताप हे शपथविधीनंतर लगेच अजितदादा गटात प्रवेश करतील, असे सांगितले जात आहे. तसेच शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे नेते आणि माजी आमदार अपूर्व हिरे यांनीही सोमवारी अजित पवार यांची भेट घेतली. त्यामुळे अपूर्व हिरे हे राष्ट्रवादीत प्रवेश करतील, अशी चर्चा रंगली आहे.

## भाजपकडून निरीक्षकांची ...

पान १ वरून ▶▶ भूषवलं. विजय रुपाणी आणि निर्मला सीतारामन उद्या रात्री मुंबईत दाखल होतील. त्यानंतर गुरूवारी म्हणजेच ४ डिसेंबरला सकाळी ११ वाजता भाजपच्या आमदारांची बैठक होईल. त्या बैठकीत विधिमंडळ गटनेता ठरवण्यात येईल. आमदारांशी संवाद साधून रुपाणी आणि सीतारामन त्यांच्याकडून सुचवण्यात आलेल्या नावांवर सहमती घेतील. विधिमंडळ गटनेत्याचं नाव निश्चित झाल्यानंतर ते निरीक्षकांकडून दिल्लीला कळवण्यात येईल.

भाजपकडून ४ डिसेंबरला विधिमंडळ गटनेता निवडला जाईल. त्यानंतर महायुतीकडून राज्यपालांकडे सत्ता स्थापनेचा दावा करण्यात येईल. ५ डिसेंबरला मुंबईतील आझाद मैदानात शपथविधी सोहळा संपन्न होईल. मुख्यमंत्र्यांसह दोन उपमुख्यमंत्र्यांचा शपथविधी ५ तारखेला होईल. या सोहळ्याला पंतप्रधान नरेंद्र मोदी उपस्थित असणार आहेत. ४ तारखेच्या बैठकीत मंत्र्यांची नावं निश्चित झालीच तर मग ५ तारखेला त्यांचाही शपथविधी सोहळा होईल.

नव्या सरकारमध्ये भाजपला २१ मंत्रिपदं मिळण्याची शक्यता आहे. तर शिवसेनेला १२, राष्ट्रवादीला १० मंत्रिपदं मिळू शकतात. मुख्यमंत्रिपदावरील दावा सोडल्यानंतर शिवसेना गृहमंत्रिपदासाठी आग्रही आहे. पण गृह खातं सेनेला सोडण्यास भाजप तयार नाही. आधीच्या सरकारमध्ये उपमुख्यमंत्री असताना फडणवीस यांनी गृहमंत्रिपद स्वतःकडे ठेवलं होतं. तर २०१४ ते २०१९ या कालावधीत मुख्यमंत्री असतानाही फडणवीस यांच्याकडेच गृह मंत्रालयाचा कार्यभार होता.

## स्वागताध्यक्षपदी शरद पवार...

पान १ वरून ▶▶ महाराष्ट्रातून सांस्कृतिक आणि साहित्यिक चळवळीशी प्रारंभापासून जोडले गेले आहे. त्यांनी छत्रपती संभाजीनगर, नाशिक, चिपळूण आणि सासवड येथील अखिल भारतीय साहित्य संमेलनाचे उद्घाटन केले आहे. तर, १९९० मध्ये त्यांनी स्वागताध्यक्ष व्हावे असे पुण्यातील संमेलनात समितीने ठरविले होते मात्र, त्यावर्षी ते होऊ शकले नाही. यंदा दिल्लीमध्ये महाराष्ट्राची अस्मिता ज्या व्यक्तींभोवती केंद्रीत असते त्यातून सर्वात ज्येष्ठ नाव शरद पवार यांचे आहे. त्यांच्या अनुभवांमुळे हे संमेलन अविस्मरणीय होईल आणि राजकारणाच्या पलिकडे जाऊन मराठी भाषा आणि संस्कृतीचा जागर करणारे ठरेल, असा विश्वास नहार यांनी व्यक्त केला.

### उद्घाटक कोण हे गुलदस्त्यामध्ये

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या अध्यक्षतेखाली दिल्लीमध्ये १९५४ साली झालेल्या संमलनाचे स्वागताध्यक्ष तत्कालीन केंद्रीयमंत्री काकासाहेब गाडगीळ होते. देशाचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या हस्ते संमेलनाचे उद्घाटन झाले होते. संयुक्त महाराष्ट्र चळवळीला या संमेलनानंतर बळ मिळाले आणि १ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली. आता ७० वर्षांनी दिल्ली येथे होत असलेल्या संमेलनाचे उद्घाटक कोण असावे यादृष्टीने संपर्क सुरू आहेत. मात्र, सध्या कतरी संमेलनाचे उद्घाटक कोण हे गुलदस्त्यामध्ये आहे.

## नव्या सरकारच्या शपथविधी...

पान १ वरून ▶▶ आली आहे. मंत्रिमंडळात इच्छुक माजी मंत्री असेल, तर संबंधित मंत्र्याने महायुती सरकारच्या काळात मंत्रालयात कामकाज कशा प्रकारे केलं?, संबंधित व्यक्ती मंत्रालयात किती वेळ कामकाजासाठी देत होता?, महायुती म्हणून आपल्या घटकपक्षातील आमदारांशी मंत्र्याची वागणूक कशी होती?, याबाबत अमित शाह यांनी रिपोर्टकार्ड मागवलं आहे. केंद्राच्या आणि राज्याच्या निधीचा विनियोग कशा प्रकारे मंत्र्याने केला?, संबंधित मंत्र्यामुळे महायुती अडचणीत येईल अशी परिस्थितीत निर्माण झाली होती का? वादग्रस्त वक्तव्य केली का?, या मुद्यांचं रिपोर्टकार्ड घेऊन महायुतीच्या नेत्यांना अमित शाह यांनी दिल्लीत बोलावलं आहे.

**महायुतीच्या मुख्यमंत्र्यांच्या शपथविधीच्या सोहळ्याचे महानियोजन**

मा्ुख्यामा ं त्र्या ं च्या शपथविधीसाठी जवळपास ४० हजार जणांची उपस्थिती असणार आसून पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शाह आणि केंद्रीय मंत्र्यांच्या उपस्थितीत शपथविधी पार पडणार देशातील २२ राज्यांचे मुख्यमंत्री देखील सहभागी होणार

लाडक्या बहिणींना विशेष आमंत्रण शपथविधीसाठी देण्यात येणार जवळपास दोन हजार व्हीव्हीआयपींच्या पासेसची सोय

१३ विशेष ब्लॉकमध्ये लोकांच्या बसण्याची व्यवस्था असणार तीन स्टेजची उभारणी केली जाणार एक मुख्य स्टेज आणि दोन त्याच्या आजूबाजूला छोट्या स्टेजची उभारणी केली जाणार आहे.




## कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण

### जाहीर सूचना

ज्याअर्थी, कल्याण डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील 'डोंबिवली पुर्व व पश्चिम' विभागातील सेक्टर क्र.२ व ५ मधील खालील नमूद विद्यमान रस्ते/मंजुर विकास योजनेतील रस्ते महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २१० अन्वये विकसीत करण्याचा महापालिकेचा मानस आहे.

| अनु | सेक्टर | प्रस्तावित रस्त्याचे नाव | विद्यमान/विकास योजनेतील रस्त्यांची | | प्रस्तावित रस्त्यांची रुंदी | अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | लांबी | सरासरी रुंदी | | |
| १ | ५ | मौजे-डोंबिवली येथील त्रिमुर्ती नगर अंतर्गत यु.टाईप रस्ते (एकुण ४रस्ते) | ४२५ मी. | विद्यमान रस्त्यांची सरासरी रुंदी ६.०० मी. (विद्यमान रस्ता) | ९.०० मी | मंजूर रेखांकनामधील Open Space चे क्षेत्र अंशतः कमी होणार आहे. |
| २ | ५ | मौजे डोंबिवली येथील गावदेवी सोसायटी येथील अंतर्गत व यु. टाईप रस्ते | १०० मी. | विद्यमान रस्त्यांची सरासरी रुंदी ६.०० मी. (विद्यमान रस्ता) | ९.०० मी | आरक्षण अथवा Open Space चे क्षेत्र अंशतः कमी होणार नाही. |
| ३ | २ | मौजे-डोंबिवली येथील भागशाळा मैदानाच्या मागील आरक्षण क्रं.४८ 'बगीचा' व आरक्षण क्र. ४९ 'प्राथमिक शाळा' परीसरातील रस्ते (एकुण ४ रस्ते) | ५०० मी | ६.०० मी (वि.यो.रस्ता) | ९.०० मी | आ.क्र.४७ 'व्यायाम शाळा (Gymnasium)', आ. क्र.४८ 'बगीचा (Garden)', आ.क्रं. ४९ 'प्राथमिक / माध्यमिक शाळा (PS&HS)' या आरक्षणाचे क्षेत्र अंशतः कमी होणार आहे. |
| ४ | ५ | मौजे नवागाव येथील विजय सोसायटी अंतर्गत असणारे रस्ते (एकुण २ रस्ते) | २७५ मी. | ९.०० मी (विद्यमान रस्ता) | १२.०० मी | मंजूर रेखांकनामधील Open Space चे क्षेत्र अंशत : कमी होणार आहे. |
| ५ | २ | मौजे-डोंबिवली येथील धनश्याम गुप्ते रोड, महात्मा गांधी रोड ते नाना शंकर शेठ रोड पर्यंत | ४४० मी. | १२.०० मी (वि.यो.रस्ता) | १५.०० मी | आ.क्र.३९ 'विद्यमान मच्छीमार्केटचा विस्तार (EXT To FM)', आ.क्र.३८ 'दुकान केंद्र (SC)', आ.क्र.३७ 'भाजी मार्केट (VM)' आ. क्र.३५ 'विस्तापितांसाठी घरे (HDH)' या आरक्षणाचे क्षेत्र अंशतः कमी होणार आहे. |
| ६ | २ | मौजे-डोंबिवली येथील सुभाष रोड (नाना शंकरशेठ रोड ते जुनी डोंबिवली नगरपालिका हद्दीपर्यंत | ३०० मी. | १२.०० मी. (वि.यो.रस्ता) | १५.०० मी | आ.क्र.४३ वाहन तळ (Parking)', आ.क्र.४४ 'करमणूकीचे मैदान (RG)', आ.क्र. ४६ 'पोस्ट ऑफिस (PO)', आ.क्र.४५ 'बगीचा (Garden)', आ.क्र.४७ 'व्यायाम शाळा (Gymnasium)' या आरक्षणाचे क्षेत्र अशतः कमी होणार आहे. |
| ७ | ५ | अंबिका नगर रस्ता (मानपाडा रोड संत नामदेव पथ) | ६२५ मी. | १२.०० मी (वि.यो.रस्ता) | १५.०० मी | कमर्शिअल झोन सी १ व सी २, आरक्षण क्रं.७८अ, ७८ब 'महापालिका कर्मचारी वसाहत (MSC)' या आरक्षणाचे क्षेत्र अंशतः कमी होणार आहे. |
| ८ | २ | गणेश मंदिर रोड (गणेश मंदिर नेहरु रोड ते सावरकर रोड पर्यंत) | ६६० मी. | १२.०० मी (वि.यो.रस्ता) | १५.०० मी | आ.क्र.१०७ 'खेळाचे मैदान (PG)' आ.क्र. १०९, 'करमणूकीचे केंद (RG)', या आरक्षणाचे क्षेत्र अंशतः कमी होणार आहे. |
| ९ | २ | लोकमान्य टिळक रोड (नेहरु रोड ते ताई पिंगळे चौक) | ४२० मी. | १५.०० मी (वि.यो.रस्ता) | १८.०० मी | आरक्षण अथवा Open Space चे क्षेत्र अंशतः कमी होणार नाही. |
| १० | ५ | ग.व.पाथर्ली डोंबिवली (पुर्व) येथील सितामाई अपार्टमेंट येथील विराग सोसायटी | १०० मी. | ९.०० मी (विद्यमान रस्ता) | १२.०० मी. | आरक्षण अथवा Open Space चे क्षेत्र अंशतः कमी होणार नाही. |
| ११ | ५ | रामचंद्र नगर येथील गोकर्ण हॉल ते पीएनटी कॉलनी १५.०० मी. रस्त्यापर्यंत | २४० मी. | ५ ते ६ मी (विद्यमान रस्ता) | ९.०० मी | मंजूर रेखांकनामधील Open Space चे क्षेत्र अंशतः कमी होणार आहे. |
| १२ | ५ | रागचंद्र नगर येथील प्रथमेश अपार्टमेंट ते पांडुरंगवाडी रस्ता, आरंभ हाईट्स पर्यंत | २५० मी. | ४ ते ५ मी (विद्यमान रस्ता) | ९.०० मी | आरक्षण अथवा Open Space चे क्षेत्र अंशतः कमी होणार नाही. |

ज्याअर्थी, भाग नकाशाच्या व गुगल ईमेजच्या प्रतीवर वरील अनुक्रमांक १ ते १२ चे नकाशात दर्शविल्याप्रमाणे हे अस्तित्वातील/मंजुर विकास योजनेतील रस्ते सरासरी ६.०० ते ९.०० मी. रुंदीचे उपलब्ध आहेत. कल्याण डोंबिवली महानगरपालिका ही स्मार्ट सिटी अंतर्गत येत असल्याने उक्त रस्ते हे अरूंद आहेत. सदर परीसरातील दिवसेंदिवस वाढणारी लोकसंख्या, त्याप्रमाणे वाढणारी वाहतूक व आरोग्य सेवा इत्यादी बाबींचा विचार करून जनहिताच्या दृष्टीने उक्त सेक्टर क्र. २ व ५ मधील एकूण १२ विद्यमान रस्त्यास/मंजुर विकास योजनेतील रस्त्याच्या दोन्ही बाजूच्या रेषा मा.आयुक्त महोदय यांच्या दि.१४/१०/२०२४ रोजीच्या मान्यतेनुसार विहीत करण्यात येत आहेत.

त्याअर्थी या जाहिर सुचनेव्दारे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २१० मधील तरतुदीनुसार सदर परीसरातील तसेच कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या हद्दीतील सर्व नागरीकांना या जाहिर सुचनेव्दारे कळविण्यात येते की, उक्त प्रस्तावीत केलेले १२ विद्यमान रस्ते/मंजुर विकास योजनेतील रस्ते महानगरपालिकेच्या नगररचना विभागातील विकास योजनेतील भाग नकाशाप्रमाणे विहीत करण्यात येत आहेत.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २१० प्रमाणे कोणीही वरील प्रमाणे विहित केलेल्या सदर रस्त्यांच्या रेषेत कोणत्याही प्रकारचे बांधकाम करू शकणार नाही; याची सर्वांनी नोंद घ्यावी.

१) नोटीस प्रसिध्द झालेल्या दिनांका पासून एक महिन्याच्या मुदतीत आपल्या सुचना व हरकती असल्यास मा. प्रशासक तथा आयुक्त, कल्याण डोंबिवली महानगरपालिका द्वारा सचिव, कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण यांचेकडे लेखी स्वरूपात दयाव्यात.

२) सदर नोटीस व नकाशाची प्रत नागरिकांच्या माहितीसाठी नगररचना विभाग मुख्यालय नोटीस बोर्डवर व '६/फ, ७/ह, ८/ग प्रभाग क्षेत्र' कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर लावण्यात आली आहे.

**जावक क्रमांक :-**
**कडोंमपा/जसंवि/मुका/१८८३**
**दि.०२/१२/२०२४**

**सही /-**
**(सुरेंद्र टेंगळे )**
**प्र. सहाय्यक संचालक नगररचना**
**कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण**

'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक श्री. रविंद्र नारायण घोडविंदे तथा कार्यकारी संपादक विजय गोविंद यादव यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले. (या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८/९१५८०७८६०१ E Mail – jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Registration No. THC/256/2022-2024 (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - ॲड. जयकुमार ए. रिजवानी